# प्रेस नोट

## " ट्राफीक वार्डन कार्यशाळा "

जा.क्र. ७८६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २५/११/२०१७

भंडारा:— भंडारा जिल्हयातून एनएच —६ हा महामार्ग जात असून जिल्हयामधुन १० राज्यामार्ग जात आहेत. या माहामार्ग व राज्यामार्गावर बऱ्याच प्राथमिक, माध्यमीक शाळा वसलेल्या असल्याने शाळेतील विद्यार्थ्यांची रस्ता सुरक्षा हा अतिशय संवेदनशिल विषय बनलेला आहे. अश्या प्रत्येक शाळेकरीता वाहतुक नियमनाकरीता ट्रॅफीक पोलीस नेमणे शक्य नसल्याने जिल्हा रस्ता सुरक्षा समितीचे अध्यक्ष मा. जिल्हाधिकारी साहेब व मा. पोलीस अधिक्षक विनीता साहू यांच्या मार्गदर्शनानुसार अशा सर्व मार्गावरील शाळांमधुन विद्यार्थ्यांना रस्ता ओलांडतांना मदत करण्यासाठी ट्रॅफिक वार्डन म्हणुन शिक्षकांची नेमणुक करण्यात आलेली आहे.

जिल्हयातील अश्या सर्व ट्रॅफिक वार्डनना रस्तासुरक्षे बाबत मार्गदर्शन करण्याकरीता एक कार्यशाळा दिनांक २४/११/२०१७ रोजी पोलीस मुख्यालय भंडारा येथे आयोजित करण्यात आली होती. सदर कार्यशाळेस १५० हुन अधिक ट्रॅफिक वार्डन शिक्षक हजर होते. त्यांना पोलीस आयुक्तालय, नागपुर येथील एन—कॉप्स फक्सलन्स ट्रेनिंग सेंटर येथील ट्रॅफिक टेनिंग हेड श्री. अतुल अगरकर, श्री. शांताराम ढोंबरे यांनी तसेच मा. अपर पोलीस अधिक्षक श्रीमती रश्मि नांदेडकर यांनी उपस्थित राहुन मार्गदर्शन केले.

**(मपोउपनी. प्रणती लांजेवार)**
**माहिती कक्ष भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ८८०५६५७६२**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.